महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २५ जून २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ००४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024




## भिवंडी मनपाच्या ९० जागांसाठी शिवसेना सज्ज

### - जिल्हाप्रमुख देवानंद थळे.

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शरद भसाळे

**भिवंडी :** भिवंडी शहर महानगर पालिकेवर शिवसेनेचे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनी सज्ज रहावे असे आवाहन पदाधिकारी व कार्यकर्तेना करण्यात आले आहे. तसेच

शिवसेना पदाधिकाऱ्यांनी आपापल्या प्रभाग कार्यक्षेत्रामध्ये नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या दृष्टिकोनातून कामाला लागावे शिवसेना पक्षाच्यावतीने महापालिकेच्या कार्यक्षेत्रात 90 वार्ड जागांवर निवडणूक लढविण्याची तयारी पक्षाच्यावतीने सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी दिली.

शिवसेनेच्या या अचानकपणे घेण्यात आलेल्या आक्रमक भूमिकेमुळे भाजपासह मित्र पक्षात प्रचंड खळबळ उडाली आहे. लवकरच भिवंडी महानगर पालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका होणार असल्याने महापालिका प्रशासनाचेवतीने प्रभाग वार्ड रचना काम सुरू झाले आहे.त्यामुळे शिवसैनिकांनी शिवसेनेचे पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार पक्षाची प्रत्येक वार्डात व प्रभागात मोर्चा बांधणी सुरू केली आहे.त्यामुळे कामाचा आढावा, नियोजन व आगामी निवडणूक अनुषंगाने शहरातील पद्मानगर येथे

शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांच्या नेतृत्वाखाली व सेनेचे उपनेते रूपेश म्हात्रे, लोकसभा संपर्क प्रमुख मदन नाईक यांच्या उपस्थितीत आजी व माजी नगरसेवक,पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक सोमवारी सायंकाळी आयोजित करण्यात आली होती.या बैठकीस भिवंडी पुर्व विधानसभा मतदारसंघाचे शहरप्रमुख संजय काबुकर,पश्चिम शहरप्रमुख शाम पाटील,मारुती धीर्डे,नगरसेवक संजय म्हात्रे,कमलाकर पाटील,शरद धुळे,दिलीप गुळवी,दिपक नागरे यांच्यासह आजी व माजी नगरसेवक,पदाधिकारी उपस्थित होते.आगामी होणाऱ्या निवडणुकीत सर्वच पक्षांची भूमिका महत्त्वाची असणार आहे त्यामुळे शिवसेनेच्यावतीने भिवंडी पालिका कार्यक्षेत्रातील 90 वार्डांची चाचपणी आढावा घेतला जात असुन सर्वच जागा लढविण्यासाठी तयारी सुरू केली असल्याची माहिती जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी दिली.सर्व समाजातील लोकांना सोबत घेऊन ही निवडणूक शिवसेना लढविणार असल्याची माहिती थळे यांनी दिली. पालिकेचे आजी व माजी नगरसेवक,महिला संघटीका व पदाधिकाऱ्यांनी आपल्या प्रभागाचा आढावा घेऊन कामाला सुरुवात करावी असे आवाहन लोकसभा संपर्क प्रमुख मदन नाईक व सेनेचे उपनेते रूपेश म्हात्रे यांनी बैठकीत केले.

यावेळी प्रास्थाविक भाषणात शहरप्रमुख शाम पाटील यांनी प्रभाग रचना व संघटना संदर्भात माहिती देत सर्वांनी एकत्रितपणे काम करावे व शिवसंपर्क मोहीम राबविण्यात यावी विजय आपलाच आहे असे आवाहन केले.

## आमदार बालाजी किणीकर यांच्याकडून बिरसा मुंडा भवन निर्माणाची पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** ता. २४ (बातमीदार)

अंबरनाथ येथील चिखलोली ठाकूरपाडा येथे आदिवासी बांधवांसाठी बिरसा मुंडा भवनची निर्मिती करण्यात येत आहे. त्यामुळे आदिवासी बांधवांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या पुढाकाराने आदिवासी बांधवांसाठी भवनची उभारणी होत आहे. आदिवासीयांना त्यांच्या विविध कार्यक्रमांसाठी, लग्न सोहळ्यासाठी हक्काचे असे सभागृह उपलब्ध व्हावे, अशी मागणी अनेक वर्षापासूनची होती. आमदार डॉ. बालाजी किणीकर यांनी यासाठी पुढाकार घेऊन जिल्हास्तर नगरोत्थान योजनेतून ५२ लाख रुपये मंजूर केले. आदिवासी बांधवांसाठी बिरसा मुंडा भवन उभारण्याचे काम सुरू करण्यात आले असून, या भवनचे काम अंतिम टप्प्यात आहे. नुकतीच आमदार किणीकर यांनी भवन निर्मितीची पाहणी केली. या वेळी युवासेनेचे निखिल चौधरी, रामदास शिंगवे आदी उपस्थित होते.

# शक्तिपीठ महामार्गाच्या भूसंपादनाला मान्यता

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य सरकारच्या ई-कॅबिनेटला मंगळवारी (ता.24) पार पडली. या बैठकीत महायुती सरकारकडून सर्व मंत्र्यांना आयपॅडचे वाटप करण्यात आले. बैठकीआधी सरकारचा अजेंडा बाहेर न येण्यासाठी ई कॅबिनेटचा उपाय शोधून काढल्याची चर्चा आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग-पवनार (जि.वर्धा)ते पत्रादेवी (जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील साडेतीन शक्तिपीठ, दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर अंबेजोगाई सहित १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा हा शक्तिपीठ महामार्ग आहे. हा प्रकल्प महामंडळामार्फत राबवणार असून प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.




**आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील प्रमुख निर्णय**

• महाराष्ट्र शक्तीपीठ महामार्ग - पवनार (जि.वर्धा) ते पत्रादेवी ( जि. सिंधुदुर्ग) या महाराष्ट्र गोवा सरहद्द शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गास मान्यता. राज्यातील साडेतीन शक्तिपीठ , दोन ज्योतिर्लिंग आणि पंढरपूर अंबेजोगाई सहित १८ तीर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तिपीठ महामार्ग. प्रकल्प महामंडळामार्फत राबवणार, प्रकल्पाच्या आखणीस तसेच भूसंपादनासाठी २० हजार कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता.

• आदिवासी शासकीय वसतीगृहांमधील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता व आहार भत्यामध्ये वाढ. दरमहा मिळणाऱ्या निर्वाह व आहार भत्यात दुपटीने वाढ, वार्षिक शैक्षणिक साहित्य खरेदी भत्यात भरीव वाढ.

• कोयना धरणाच्या पायथा विद्युतगृहाच्या प्रकल्पास सुधारित प्रशासकीय मान्यता.

• महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा करून, आगामी अधिवेशनात महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विधेयक आणणार.

• सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांसाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीतील तडजोडीसाठी सुधारणा विधेयक आणणार.

• वांद्रे पूर्व येथील उच्च न्यायालयासाठी आरक्षित भूखंडावरील विस्थापितांसाठी द्यावे लागणारे ३१ कोटी ७५ लाख रुपयांचे शुल्क माफ. याठिकाणचे विस्थापितांचे अनिवासी व निवासी गाळे सार्वजनिक बांधकाम विभागास निशुल्क हस्तांतरीत होणार.

• महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हडको संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या २ हजार कोटींच्या कर्जास शासन हमी देण्याचा, त्यापोटीचे हमी शुल्क माफ करण्याचा निर्णय. यात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्य पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीचे ८२२ कोटी २२ लाख, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनिःसारण प्रकल्पासाठी २६८ कोटी ८४ लाख रुपये व मिरा-भाईंदर महापालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीच्या ११६ कोटी २८ लाख रुपयांच्या मागणीचा समावेश.

## भिवंडी वाडा महामार्ग खड्डयात

### दुरुस्ती न झाल्यास श्रमजीवीचा आंदोलनाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे आणि पालघर जिल्ह्याला जोडणाऱ्या भिवंडी-वाडा मार्गावर खड्डयांचे झालेले डबके, अपघात आणि वाहतुक कोंडी यामुळे येथील स्थानिक संतप्त झाले आहेत.भिवंडी वाडा मार्गावर भिवंडीतील वंजारपट्टी ते अंबाडी हे अंतर पार करण्यासाठी किमान एक तास लागत होता. आता या मार्गावर तीन ते चार तास वाया जात आहेत. विद्यार्थी देखील कोंडीमुळे त्रस्त झाले असून कोंडीमुळे वेळेत शाळेत पोहचत नाही. तर काहीजण शाळेत जाणे टाळत आहे. कामानिमित्ताने नोकरदारांचेही हाल होत आहेत. खड्डयांमुळे येत्या गुरुवारी येथील श्रमजीवी संघटनेच्या माध्यमातून आंदोलनाचे हत्यार उपसण्यात येत आहे.



ठाणे जिल्ह्यातील भिवंडीमध्ये मोठ्याप्रमाणात गोदामे आहेत. उरण येथील जेएनपीटी बंदरातून सुटणारी हजारो अवजड वाहने भिवंडी-वाडा मार्गे पालघर किंवा त्या मार्गालगतच्या गोदामात जातात. भिवंडी-वाडा मार्गालगत काही गावे देखील आहेत. या गावातील रहिवाशांना मुख्य भिवंडी शहरात किंवा ठाणे, पालघरला जाण्यासाठी हाच मार्ग महत्त्वाचा आहे. पावसाळ्यात दरवर्षी या रस्त्याच्या स्थितीविषयी प्रश्न उपस्थित होतात. परंतु पावसाळा संपल्यानंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे होते. यावर्षी या रस्त्याची अवस्था अत्यंत वाईट झाली आहे. अनेक ठिकाणी खड्डयांचा आकार डबक्याच्या आकारा इतका झाला आहे. खड्डयांमुळे मार्गावर अवजड वाहनांच्या रांगा लागतात.

## उल्हासनगर मनपा इमारतीच्या पुनर्बांधणीचा मार्ग मोकळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** उल्हासनगर महापालिकेच्या जुन्या झालेल्या प्रशासकीय इमारतीच्या पुनर्बांधणीचा मार्ग मोकळा झाला आहे. या इमारतीच्या कामासाठी नगरविकास विभागाकडून ५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. नगरविकास विभागाने नुकताच याबाबतची मान्यता दिली आहे. उल्हासनगर महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीच्या उभारणीसाठी गेल्या अनेक दिवसांपासून निधीची मागणी केली जात होती. अखेर ही मंजूरी मिळाल्याने प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी हालचाली सुरू होणार आहेत. उल्हासनगर महापालिका क्षेत्रात धोकादायक इमारतींचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आहे. विविध कारणांमुळे शहरातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न रखडलेला आहे. त्यामुळे शहरातील रहिवाशी जीव धोक्यात घालून इमारतींमध्ये वास्तव्यास आहेत. त्यातच शहराचा गाडा हाकणाऱ्या उल्हासनगर महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतही गेल्या काही वर्षात पडझडीचे प्रकार झाले आहेत. कधी छप्पराचे प्लास्टर तर कधी सिलिंगचा भाग कोसळल्याचे यापूर्वीच्या घटनांमध्ये दिसून आले होते. त्यामुळे प्रशासकीय इमारतीची पुनर्बांधणी करावी अशी मागणी गेल्या अनेका वर्षांपासून होती.



## ठाणे महापालिकेकडून पाच दिवसात ७३ अनधिकृत बांधकामांवर धडक कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (24) :** मा. उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश आणि प्रभाग समितीच्या बीट निरिक्षकांनी केलेल्या पाहणीत आढळलेल्या अनधिकृत बांधकामांवर महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकामार्फत कारवाई करण्यात येत आहे.

दिनांक 19 ते 24 जून पर्यत एकूण 73 अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली. यात पूर्ण इमारत, प्लिंथ, कॉलम, स्लॅब, वाढीव बांधकाम याप्रकारच्या बांधकामांचा समावेश आहे. यापुढेही अनधिकृत बांधकामांच्या निष्कासनाची प्रभाग समिती निहाय कारवाई सुरूच राहणार आहे.



अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी प्रत्येक प्रभाग समिती क्षेत्रात सहाय्यक आयुक्त यांच्या नेतृत्वात विशेष पथकाची स्थापना केली आहे.

या पथकांनी आपापल्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबतच्या तक्रारी आणि प्रत्यक्ष पाहणी यांच्या आधारे तत्काळ कारवाई करण्याचे आदेश आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत. त्यानुसार, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाईची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. तळ मजला अधिक चार मजले, सीआरझेड क्षेत्रात उभारण्यात आलेले भंगाराचे गोडावून, व्याप्त अनधिकृत इमारतीवरील वाढीव बांधकाम, प्लिंथ, दुकानातील वाढीव बांधकाम आदी वेगवेगळ्या तक्रारींनुसार ठाणे महापालिका क्षेत्रात १९ आणि २० जून रोजी झालेल्या कारवाईत एकूण ३३ अनधिकृत बांधकामांवर तर 21 आणि 23 जून रोजी झालेल्या कारवाईत एकूण 30 अनधिकृत बांधकामांवर तर आज 24 जून रोजी 10 अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली.दिवा येथील सर्व्हे क्रमांक 178, 179, 180 या ठिकाणच्या दोन इमारती पूर्णपणे  निष्कसित करण्यात आल्याची माहिती उपायुक्त (अतिक्रमण विभाग) शंकर पाटोळे यांनी दिली. या कारवाईमध्ये उपायुक्त (परिमंडळ), सर्व सहाय्यक आयुक्त, अतिक्रमण आणि बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. या कारवाईसाठी पोकलेन, जेसीबी, गॅस कटर, ट्रॅक्टर ब्रेकर, मनुष्यबळ यांचा वापर करण्यात आला. पोलीस आणि महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान यांच्या बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आल्याचेही पाटोळे यांनी सांगितले.




## सरकारचे काम लोकांसमोर घेऊन जायची जबाबदारी आपली -आ. प्रवीण दरेकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** पंतप्रधान मोदी सरकारला 11 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल उल्हासनगरमध्ये आयोजित मेळाव्याला प्रवीण दरेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्थानिक आमदार कुमार आयलानी, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेश वधारिया, विनोद गोवानी, प्रशांत पाटील, प्रदीप भालचंदानी, प्रकाश माकेजा यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आता महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका येणार आहेत. केंद्र आणि राज्य सरकारचे काम लोकांसमोर घेऊन जायची जबाबदारी आपली आहे. जी 11 वर्षे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशाला समर्पित केली, ती आपणही समर्पित भावनांनी लोकांपर्यंत पोहोचवली पाहिजेत, असे आवाहन भाजपा विधान परिषद गटनेते आ. प्रवीण दरेकर यांनी कार्यकर्त्यांना येथे केले.

उल्हासनगरातील पदाधिकारी, कार्यकर्ते यांना घराघरांत जाऊन पत्रकांद्वारे, सोशल मीडियाद्वारे पंतप्रधान मोदींची प्रभावित करणारी भाषणे लोकांपर्यंत पोहोचवा, असे आवाहन दरेकर यांनी केले.









## वाचक मनोगत



### आणीबाणीमुळे लोकांना लोकशाहीचे महत्व कळले...

आज २५ जून, भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू करण्याच्या घटनेला आज ५० वर्ष पूर्ण झाली. बरोबर ५० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली. १२ जून १९७५ रोजी अलाहाबाद उच्च न्यायालयाने इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द करून त्यांना पुढील सहा वर्ष निवडणूक लढवण्यास बंदी घातली. राजनारायण यांनी इंदिरा गांधी यांनी १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत गैरव्यवहार केला असा आरोप करून खटला दाखल केला होता. या खटल्याच्या निकाल १२ जूनला लागला. या निकालानंतर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांची खासदारकी रद्द झाल्याने त्यांनी पंतप्रधानपद सोडावे अशी मागणी होऊ लागली. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयाचे सुट्टीच्या काळातील न्यायाधीश व्ही. आर कृष्ण अय्यर यांनी उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती देण्यास नकार दिला मात्र सर्वोच्च न्यायालयाचा निकाल येईपर्यंत इंदिराजींना पंतप्रधान पदावर राहण्यास मुभा दिली. हा निर्णय आल्यानंतर पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी स्वतःची सत्ता टिकवण्यासाठी २५ जून १९७५ च्या रात्री देशात आणीबाणी लागू केली. आणीबाणीच्या मसुद्यावर तत्कालीन राष्ट्रपती फकरुद्दीन अली अहमद यांनी रात्री बारा वाजता स्वाक्षरी केली. आणीबाणी लागू झाल्यानंतर इंदिरा गांधी यांच्या हातात अनिर्बंध सत्ता आली. माध्यमांची मुस्कटदाबी सुरू झाली. जयप्रकाश नारायण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जॉर्ज फर्नांडिस, चौधरी चरणसिंग, मोरारजी देसाई, नानाजी देशमुख, मधु दंडवते, रामकृष्ण हेगडे, सिखंदर बख्त, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासह अनेक मोठे नेते तसेच पत्रकारांना मिसा कायद्याखाली तुरुंगात डांबण्यात आले. आणीबाणीच्या २१ महिन्यांच्या कालावधीत ११ लाख लोकांना तुरुंगवास भोगावा लागला. सक्तीची नसबंदी आणि झोपडपट्टी हटवून शहरे सुशोभित करण्याच्या मोहिमेत लोकांवर जुलूम जबरदस्ती करण्यात येऊ लागले. त्यामुळे देशभर भीतीचे आणि संशयाचे वातावरण निर्माण झाले. सुरवातीला दहशतीत असणारे नागरिक या अन्यायाविरुद्ध नंतर रस्त्यांवर उतरू लागले. सामाजिक कार्यकर्ते, नेते, अभिनेते, कलाकार, बुद्धीवादी लोक, साहित्यिक असे सारे लोक आणीबाणीच्या विरोधात एकवटले. सर्व स्तरातून आणीबाणीला विरोध होऊ लागला. संपूर्ण देश आणीबाणीच्या विरोधात एकवटल्याचे पाहून इंदिरा गांधी यांनी आणीबाणी सैल करून १९७७ साली लोकसभेच्या निवडणुका घेतल्या. या निवडणुकीत इंदिरा गांधी, संजय गांधी यांचा दारुण पराभव झाला. विरोधी पक्ष असलेल्या जनता पार्टीचे सरकार आले. मोरारजी देसाई हे पंतप्रधान बनले. पण या सरकारमध्ये कमालीचा अंतर्विरोध होता. हाती आलेली सत्ता या विरोधी पक्षांना टिकवता आली नाही. पुढील निवडणुकीत इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधान बनल्या. आणीबाणी ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील काळे पर्व म्हणून ओळखली जाते. ४९ वर्षांपूर्वी घडलेल्या या दिवसातील घडामोडींनी देशाला लोकशाहिवरील श्रध्येचे महत्त्व काय आहे याची जाणीव करून दिली. भारताच्या इतिहासातील या घटनेची आठवण म्हणजे कोणाला चांगले वाईट ठरवणे नसून लोकशाहीची ताकद व सामर्थ्य यांचे स्मरण होय.

**श्याम ठाणेदार**

# रायगड जिल्ह्यात ऑलिंपिक डे उत्साहात साजरा



रायगड( जिमाका)

दि.24:-जगातील सर्वोत्तम क्रीडा महोत्सव ऑलिंपिक ची स्थापना दि.23 जून, 1894 साली पियरे डी कुबर्टीन यांनी केली. "आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती (DOC)" तसेभ्व जगातील सुमारे 200 पेक्षा अधिक देशाचे ऑलिंपिक संघ हे जागतिक ऑलिंपिक समितीच्या स्थापनेचा दिवस म्हणून 23 जून रोजी ऑलिंपिक डे साजरा करतात. त्यानुषंगाने जिल्हा क्रीडा अधिकारी रायगड यांचे वतीने एकविध क्रीडा संघटना प्रतिनीधी, क्रीडा शिक्षक व क्रीडा प्रेमी नागरिक यांचेसाठी परीसंवाद, चर्चासत्र व कार्यशाळेचे आयोजन तालुका क्रीडा संकूल पनवेल येथे घेण्यात आले.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी ऑलिंपिक डे दिनाचे महत्व विचारात घेऊन "विकसित महाराष्ट्र 2047 साठी कीडा क्षेत्रातील नागरिकांचे मत जाणून घेण्यासाठी एक विशेष प्रश्नावली तयार करण्यात केली आहे. या प्रश्नावलीच्या माध्यमातून मिळणाऱ्या सुचर्नावर आधारीत क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी धोरण ठरविण्याची कार्यवाही केली जाणार आहे. यातून महाराष्ट्राला जागतिक स्तरावर अग्रेसर बनविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे सांगितले. विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी व क्रीडा शिक्षकांनी सहभाग घेतलेल्या चर्चासत्रात मांडलेल्या विचारांमध्ये क्रीडा सुविधांचा अभाव, मैदानांची कमतरता, खेळांचे अद्यावतीकरण करणे, CSR फंडांच्या माध्यमातून खेळाडूंना, संघटनांना आर्थीक पाठबळ पुरविणे, क्रीडा शिक्षक हा मैदानावरच दिसायला हवा, प्रत्येक शाळा महाविद्यालयांमध्ये वर्गावर्गात स्पर्धा व्हाव्यात. शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एका खेळात सहभाग घेणे अनिवार्य करावे, प्रत्येक शाळेचे क्रीडा विषयक मुल्यमापन करण्यासाठी शासनस्तरावरुन क्रीडा तज्ञ व्यक्तिच्या तालुका स्तरापासून समित्या गठित कराव्यात. जिल्हा वार्षिक योजनेमधून प्रत्येक शाळेला क्रीडा साहित्य पुरविण्यात यावे, खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी किमान जिल्हास्तरापासून ते आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत खेळाडूंना क्रीडा शिष्यवृत्ती व आधुनिक साहित्य देणे यासाठी शासन धोरणानुसार जिल्हा नियोजनाच्या एकूण वार्षिक निधीच्या 1% पर्यंत निधी क्रीडा विकासासाठी राखीव ठेवण्यात यावा. खेळाडूंसाठी विमा असावा. तसचे शासनाच्या नवीन क्रीडा धोरणानुसार आमुलाग्र बदल घडत आहे आणि याचाच प्रत्यय म्हणून महाराष्ट्र गेल्या अनेक वर्षापासून शालेय क्रीडा स्पर्धा, नॅशनल गेम्स, खेला इंडीया अश्या अनेक राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये अग्रेसर राहत आहे. महाराष्ट्रातील लोकप्रिय असलेले खेळ कबड्डी, खो-खो, कुस्ती, फुटबॉल, ॲथलेटिक्स या शिवाय रायफल शुटींग, बैंडमिंटन, टेबल टेनिस, जलतरण, जिम्नॅस्टिक्स यासारख्या खेळांमध्ये प्रगती करत असल्याचे दिसून येत आहे. यासाठी खेळाडूंना मोठ्या बक्षिसाच्या रक्कमा या स्पर्धाव्दारा दिल्या जात आहेत. थेट भरती आणि 5% आरक्षण खेळाडूंना आता नौकऱ्यांची दारे खुलू लागली आहेत. खेळाडूंना खेळांव्दारे सुध्दा आता सक्षम होण्याचा मार्ग मिळू लागला असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी सांगितले.

"विकसित महाराष्ट्र 2047 चे कीडा क्षेत्रातील स्वप्न साकाण्यासाठी आणि महाराष्ट्राची जागतिक स्तरावर एक वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी सर्वप्रथम पालक, शाळा, प्रशिक्षक आणि संघटना यांनी निश्चित गाठ बांधावी. बदलत्या काळानुसार शासनाकडून खेळाडूंच्या प्रोत्साहनासाठी आवश्यक बदल तत्परतेने होत आहे ही एक प्रशासनाने खेळाडूंसाठी घेतलेली दखल आहे. सदर चर्चासत्रात जगदीश मरागजे, श्री. कुंभार सर, चलमले सर संघटनेमार्फत सोनार, सुभाष पाटील, विशाल यादव आणि अनेक तज्ञांनी आपले मत मांडले. तसेच जिल्हा क्रीडा संकूलाच्या मैदानापासून "ऑलिंपिक मशाल रॅली" चे आयोजन करण्यात आले, यामध्ये जवळपास 100 खेळाडूंनी सहभाग घेतला. आजच्या दोन्ही कार्यक्रमांच्या यशस्वी होण्यासाठी तालुका क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनूर, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी श्रीमती तपस्वी गोंधळी, अॅथलेटिक्स प्रशिक्षक यतिराज पाटील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचा कर्मचारी वर्ग यांनी विशेष परीश्रम घेतले.



# वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण- राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री मा. श्री. संजयजी सावकारे यांच्या हस्ते गरिब- गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप, गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांचा सत्कार आणि आपलं प्रतिष्ठान ह्या आपल्या संघटनेतील सक्रिय कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला.

कल्याण येथील स्वामी नारायण हॉल येथे ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर सर्वश्री दिनेशभाई ठक्कर, माजी आमदार नरेंद्र पवार, बिर्ला महाविद्यालयाचे उप प्राचार्य हरिश दुबे, अनिल काकडे व्यासपीठावर उपस्थित होते.

सामाजिक कार्यकर्ते निलेश भोईर यांनी वस्त्रोद्योग मंत्री श्री. संजय सावकारे यांचे स्वागत केले. वयाची ६५ वर्ष संपेपर्यंत रक्तदान करून आदर्शव्रत ठरलेल्या सौ. शकुंतला राय यांचा विशेष सत्कार वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कच्छी युवक संघाचे अध्यक्ष तरुण नागदा, रोटी डे चे नितील चंदैया , पत्रकार विष्णुभाई चौधरी, अतुल फडके, सामाजिक कार्यकर्ते मणिलाल शिंपी, सुप्रसिद्ध योगाचार्य वीणा निमकर, प्रियंका चिकशेट्टी यांचा वस्त्रोद्योग मंत्री श्री. संजय सावकारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच आपलं प्रतिष्ठानचे दत्ता गोरे, महिला आघाडी अध्यक्षा सुनंदा जाधव, मंगला आरोटे, अरुणा कदम, सोनल लोहार, वंदनावाणी इत्यादींचाही सन्मान वस्त्रोद्योग मंत्री श्री. संजय सावकारे यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अनिल काकडे यांनी केले

## खड्डे - महापालिका कि बांधकाम विभाग ?

# वाहतूक पोलिस आणि वाहनचालकां मधील हाणामारीत नक्की कुणाचा हात ?



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कतेच कल्याण शहर वाहतूक शाखेचा वाहतूक पोलीस आणि वाहन चालक यांच्यातील हाणामारी चा विडिओ तूफान व्हायरल झाला, तसेच पाहिले तर ही काय घटना पहिलीच नाही,या अगोदर किंवा आता पावसाळ्यात रोजच घडत आहेत, त्यामुळे असे प्रकार वारंवार का घडतात, याचा विचार केला तर रस्त्यावरील मोठ मोठे खड्डे, याकडे दुर्लक्ष करणाऱ्या महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, अथवा महागाईच्या आगीत दंडात्मक कारवाची वाढलेली रक्कम ही असू शकतात,कल्याण नगर महामार्गावर शहाड ब्रीज, वालधुनी पुल, शिवाजी चौक, सहाजानंद चौक, लालचौकी, पत्रीपुल, टाटा पावर हाऊस, दुर्गाडी चौक, नेहरु चौक, सेंट्रल हॉस्पिटल रस्ता, नेतीवली नाका असे एक ना शेकडो पॉईट आहेत की जेथे सदैव वाहतूक कोंडी झालेली असते. या मागील कारणांचा शोध घेतला असता, रस्ते तेवढेच मात्र दररोज वाहनांची वाढणारी संख्या?अशातच दरवर्षी पावसाळ्यात उगवणारे खड्डे, यामध्ये बंद पडणारी मोठी अवजड वाहने, यामुळे होणारी तूफान वाहतूक कोंडी, हा अनुभव रोज शहाड पुलावर येतो, याकडे संबधित महापालिका सोईस्कर करत असलेले दुर्लक्ष, सार्वजनिक बांधकाम विभागाचे रस्ते, त्यावरील अर्धवट कामे, हे कमी की काय?म्हणून मेट्रोच्या नावाखाली अडवून ठेवलेली जागा, या सर्वाचा परिणाम वाहतूक कोंडी वर दिसून येतो,दुसरीकडे महागाईच्या आगीत होरपळ असताना वाहतूक नियम मोडल्यास पोलिसांच्या इशा-याचे पालन न केल्यास ५००रुपयापासून ते जास्तीत जास्त१०हजार रुपयांपर्यत दंड आकारण्यात आला आहे, त्यामुळे यातूनही हाणामाऱ्या झाल्या तर नवल वाटू नये, तरीही वाहतूक नियमांचे पालन करणे, ओहरसीट, ओहरटेक न करणे, आणि सर्वात महत्त्वाचे ,वर्दी ,वर कोणत्याही परिस्थितीत हात न उचलने हे प्रत्येक सजग नागरिकांचे कर्तव्य, आहे. पोलीस आपल्यासाठी आहेत याचा विचार करून आपण वागले पाहिजे, तसेच पोलिसांनी देखील वाहनचालक किंवा नागरिकांशी सौजन्याने, आपुलकी ने,प्रेमाने वागणूक करून त्यांनी कसा नियम मोडला आहे हे समजून सांगायला हवे. दादागिरी,करु नये, वर्दीचा माज दाखवू नये, उलट हातात हात घालून संबधित यंत्रणेला जाब कसा विचारता येईल हे पहावे, वार्डन चे मानधन वाढवावे, टोईंग चालू करावे, म्हणजे कोणी कुठेही रस्त्यावर गाड्या लावणार नाही, पोलिसांची रिक्त पदे भरावी, रस्ते रुंद, खड्डे मुक्त करावे.असे झाल्यास कोणी कोणावर हात उचलण्याची वेळ येणार नाही



# वेंगुर्ला भाजपा कार्यालयात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांना अभिवादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांचा बलिदान दिवसानिमीत्त सोमवार दिनांक २३ जून २०२५ सकाळी 10.30 वाजता वेंगुर्ला भाजपा कार्यालयात पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले .

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष श्री प्रसन्ना उर्फ बाळू देसाई, तालुकाध्यक्ष श्री विष्णू उर्फ पपू परब, जिल्हा निमंत्रीत सदस्य श्री साईप्रसाद नाईक, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष सौ सुजाता पडवळ, युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष श्री हेमंत गावडे, तालुका अध्यक्ष श्री प्रणव वायंगणकर, अल्पसंख्यांक सेल चे सायमन आल्मेडा, हसीना बेगम मकानदार, जिल्हा का. का सदस्य श्री प्रितेश राऊळ, श्री नीलेश सामंत, ओबीसी मोर्चाचे श्री शरद मेस्त्री, श्री रमेश नार्वेकर, महिला मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष वृंदा गवंडळकर , शहराध्यक्ष सौ श्रेया मयेकर, शहर चिटणीस सौ रसिका मठकर, सौ आकांक्षा परब, सौ मानसी परब, मच्छीमार सेल चे श्री अनंत केळुस्कर, बूथ अध्यक्ष श्री पुंडलिक हळदणकर, श्री कृष्णा हळदणकर, श्री भूषण सारंग, किसान मोर्चाचे श्री यशवंत पंडित, आसोली सरपंच श्री बाळा जाधव, श्री सोमा मेस्त्री, बूथ अध्यक्ष श्री शेखर काणेकर , श्री राजन केरकर, श्री गुरूनाथ घाडी, श्री दाजी परब, माजी बूथ अध्यक्ष श्री अजित कनयाळकर , बूथ अध्यक्ष श्री सीताराम साळगावकर , श्री संतोष सावंत, श्री मारुती दोडशानट्टी ,श्री महेश प्रभुखानोलकर, श्री गावडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पेण येथे धर्मवीर छ. संभाजी महाराज चौकाचे काम पूर्ण करण्याची छावा संघटनेची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : प्रतिनिधी पेण तालुक्यातील चिंचपाडा शांति निकेतन सोसायटी समोरील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकाच्या कामास नवीन ठेकेदार नेमून सुरवात व्हावी नाही तर सदर कामाची रिटेंडरिंग करन्यात यावी यासाठी छावा सामाजिक संस्था अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, ताराराणी ब्रिगेट राष्ट्रीय प्रदेश अध्यक्षा वंदना मोरे, उपराष्ट्रीय अध्यक्षा कविता खोपकर सह्याद्री प्रतिष्ठान कार्याध्यक्ष तथा उबाठा गटाचे शिवसेना तालुकाप्रमुख समीर म्हात्रे, नंदा म्हात्रे, राम ठाकुर, अस्थिनी ठाकुर, सभिमन्यू म्हात्रे आदी पदाधिकारी शिव प्रेमींनी पेण नगरपालिके समोर ठिय्या आंदोलन पुकारले तसेच प्रशासन मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या कार्यालयात जाऊन जाब विचारला यावेळी पालिका कार्यालयाकडून मे. ए. जी. इंजीनियरिंग अँड कन्स्ट्रक्शन कंपनी यांना पेण तालुक्यातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या चौकाचे सुशोभीकरण व आयलँड विकसित करण्याचे काम देण्यात आले होते ते काम पूर्ण झालेले नाही तर ४ वर्षापासून छावा क्रांतिवीर सामाजिक संघटनेची फक्त फसवणूक केली जात आहे. ठेकेदाराचे काम थांबवून कामाची नवीन निविदा काढण्यात यावी व लवकरच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौकाचे काम पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्याशी चर्चा करण्यात आल्या नंतर छत्रपती संभाजी महाराज चौकाचे सुशोभिकरण व आयलँड विकसित करण्याचे काम ठेकेदाराने पूर्ण न केल्याने रिस्क अँड कॉस्ट पध्दतीने काम रद्द करणेत येऊन त्यांचे विरुध्द करारनाम्यातील अटी शर्तीन्वये कारवाई करण्यात येईल तसेच नवीन कामाची ई निविदा २ दिवसात काढण्यात येईल तसेच दिलेल्या मुदतीत ऑक्टोबर २०२५ अखेर पूर्ण करणेत येईल असे सांगितल्याने करण्यात आलेले ठिय्या आंदोलन तात्पुरते थांबवण्यात आले असल्याचे सांगण्यात आले.

# आदिवासी आरोग्य अभ्यास समिती सदस्यांची शहापूर तालुक्यातील अंगणवाडी केंद्रांना भेट



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** दि. २१ जून २०२५ रोजी शहापूर तालुक्यातील अंगणवाडी केंद्र मुसईवाडी, बीट शेणवा, प्रकल्प शहापूर येथे आदिवासी आरोग्य अभ्यास करणाऱ्या समितीचे सदस्य नरेश आकावरू (प्रोजेक्ट ऑफिसर, कळवण), हर्षाली घुले ( पॉलिसी रिसर्चर), ओवीया शंकरन (खुशी बेबी, इंटर्न) यांनी भेट दिली. आदिवासी भागातील बालकांचे पोषण, पूर्वप्राथमिक शिक्षण आणि माता बालसंगोपनावरील आरोग्यविषयक अंमलबजावणीबाबत प्रत्यक्ष पाहणी व संवाद साधण्यात आला.

भेटीदरम्यान समिती सदस्यांनी अंगणवाडी, पूर्व प्राथमिक शिक्षणात सहभागी होत मुलांसोबत संवाद साधला. तसेच गरोदर माता व स्तनदा मातांशी संवाद साधून त्यांच्या समस्यांची माहिती घेतली. अंगणवाडी सेविकेच्या मार्गदर्शनाने पोषण ट्रॅकर प्रणाली, सॅम (SAM) मुलांसाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना, दिला जाणारा नियमित आहार व 'अमृत आहार' याविषयी सविस्तर माहिती घेऊन चर्चा केली. या पाहणी दरम्यान अंगणवाडीत शिजवलेला आहार चाखून प्रत्यक्ष चव घेण्यात आली. मुलांसाठी व पालकांसाठी अंगणवाडी स्तरावर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत सेविका व मदतनीस यांच्याशी सविस्तर संवाद साधण्यात आला.

या दौऱ्यात बालविकास प्रकल्प अधिकारी (शहापूर) धनश्री साळुंखे, तालुका वैद्यकीय अधिकारी (शहापूर), आरोग्य विभागाचे तालुका पर्यवेक्षक, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी, आशा सेविका, तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते. समिती सदस्यांनी केंद्रातील कार्याबाबत समाधान व्यक्त केले.



**बुधवार**
**२५ जून २०२५**

| मेष | वृषभ | मिथुन | कर्क |
|---|---|---|---|
| मन प्रसन्न राहील. कुटुंबात धार्मिक कार्याचे नियोजन करता येईल. काही चांगले करण्याचा प्रयत्न कराल. | दीर्घकाळ निरोगी राहण्यासाठी तुम्ही चांगला आहार घ्यावा. विचाराने समस्या सोडवाल. | दिवस तुमच्यासाठी उत्तम राहील. मोठे निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला आहे. कर्ज घेऊ नका | वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्याना आज खूपच मेहनत करावी लागेल. वरिष्ठांचे मार्गदर्शन लाभेल. |
| **सिंह** | **कन्या** | **तूळ** | **वृश्चिक** |
| कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. ऑफिसमधील सहकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. | आज तुमचा दिवस चांगला जाईल. आधीच अस्तित्वात असलेल्या समस्यांचे समाधान मिळेल | दिवस तुमच्यासाठी चांगला परिणाम देईल. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे. | अभ्यासात अधिक मेहनत करावी लागेल. कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल |
| **धनु** | **मकर** | **कुम्भ** | **मीन** |
| आर्थिक बाबतीतमित्राकडून सल्ला मिळेल, ज्याचा तुम्हाला खूप फायदा होईल. प्रसन्नता वाटेल. | तुमच्या सर्व समस्या क्षणार्धात दूर होतील. सरकारी कामात तुम्हाला मोठा फायदा होण्याची शक्यता . | आज तुम्ही तुमच्या मुलांसोबत सहलीला जाऊ शकता. मुलांसमवेत चांगला वेळ घालवाल. | तुम्ही एखाद्या तज्ञाचा सल्ला घ्याल, हा सल्ला उपयुक्त ठरेल. आज महिलांसाठी दिवस अनुकूल |

# आषाढीच्या दिवशी भगवान जगन्नाथाची रथयात्रा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** आषाढी एकादशीच्या दिवशी रविवार, ६ जुलै रोजी कल्याणमध्ये आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघाकडून भगवान जगन्नाथाची भव्य रथयात्रा काढण्यात येणार आहे. संघटनेचे अनुयायी जगदीश माधव दास यांनी सांगितले की, रथयात्रा दुपारी ३ वाजता कल्याण पश्चिमेतील वसंत व्हलीच्या डी-मार्ट येथून सुरू होईल.




# महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग डागोर यांची ठाणे महापालिकेस भेट

## महापालिका सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन, मूलभूत सुविधा तसेच इतर बाबींचा घेतला आढावा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे (२४) :** महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रूक्कानसिंग डागोर यांनी आज ठाणे महापालिकेस भेट देवून महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांचे वेतन, मूलभूत सुविधा तसेच इतर बाबींचा सविस्तर आढावा घेतला. दरम्यान सफाई कर्मचारी हा सर्वात महत्वाचा घटक असून शहराचे सौंदर्य ठिकवून ठेवण्याचे काम ते सातत्याने करत असल्याने त्यांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांचा लाभ प्राधान्याने देण्याच्या सूचना आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रूक्कानसिंग डागोर यांनी महापालिका प्रशासनास दिल्या.

महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाचे अध्यक्ष शेरसिंग रूक्कानसिंग डागोर यांनी आज महापालिकेच्या कै. अरविंद पेंडसे सभागृहात त्यांनी पालिका अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. या बैठकीस महापालिका आयुक्त सौरभ राव,अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे, उपायुक्त जी.जी.गोदेपुरे, उपाआयुक्त मनीष जोशी, अनघा कदम, वैद्यकीय अधिकारी डॉ प्रसाद पाटील, आरोग्य अधिकारी डॉ राणी शिंदे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप आदी अधिकाऱ्यांसह सफाई कामगारांच्या युनियनचे पदाधिकारी, कामगार प्रतिनिधी उपस्थित होते.

ठाणे महापालिकेच्यावतीने सफाई कामगारांसाठी निवारा, एकूण कार्यरत सफाई कर्मचारी, तात्पुरते सफाई कर्मचारी, त्यांची पदोन्नती, वेतन, आरोग्यविषयक सुविधा तसेच महापालिकेच्या घनकचरा व मलनिःसारण विभागांतर्गत मनुष्यबळ, रिक्त जागा, पदोन्नती, कर्मचाऱ्यांचे भत्ते, वारसा हक्काने देण्यात येणाऱ्या नियुक्त्या आदीबाबत उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, यांनी सविस्तर माहिती दिली. सफाई कर्मचारी हा महत्वाचा घटक असून शहर स्वच्छ ठेवण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. त्यामुळे त्यांना देण्यात येणाऱ्या सेवा सुविधांचा लाभ प्राधान्याने देण्याच्या सूचना यांनी महापालिका प्रशासनास दिल्या.

सफाई कर्मचाऱ्यांसाठी चेंजिंग रूम, वैद्यकीय सुविधा, पी एफ, नवीन भरती प्रक्रिया तसेच लाड-पागे धोरणानुसार वारसा हक्काची प्रकरणे तातडीने मार्गी लावावीत. सफाई कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यावर त्यांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याची कार्यवाही ३० दिवसात करावी, तसेच सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार नोकरीत सामावून घ्यावे. त्याचप्रमाणे सफाई कर्मचाऱ्यांना रूग्णालयात कॅशलेस सुविधा उपलब्ध होतील या दृष्टीने योजना तयार करावी. ठाणे महापालिकेत कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना देखील आरोग्यविषयक सर्व सुविधा द्याव्यात, कंत्राटी कर्मचा-यांना जर ठेकेदार पगार वेळेत देत नसेल तर त्या ठेकेदाराचा ठेका रद्द करुन त्याला काळ्या यादीत टाकावे तसेच महापालिका सेवेत २५ वर्षं पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना मालकी हक्काची घरे मिळतील या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना शेरसिंग डागोर यांनी महापालिका प्रशासनास दिल्या.

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून सफाई कर्मचात्यांसाठी उत्कृष्ट सफाई कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करणे, मासिक वेतन वेळेवर अदा करणे, सफाई कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरचे फायदे हे सेवानिवृत्तीदिवशीचदिले जातात. सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षा साहित्य साधन दिली जातात, कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी केली जाते तसेच महिला कर्मचाऱ्यांची मॅमोग्राफी तपासणी केली जाते या सुविधांबाबत राज्य सफाई कर्मचारी आयोगाच्या अध्यक्षांनी समाधान व्यक्त केले.

## ग्रामविकास मंत्र्यांच्या दौऱ्याने उत्साहाचे भरते

# जिल्हा परिषदेसाठी भाजपची मोर्चेबांधणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे, ता. २४ :** जिल्ह्यातील महत्त्वाच्या महापालिकांसह ठाणे जिल्हा परिषदेवर एकहाती कमळ फुलवून सत्ता काबीज करण्याचे स्वप्न भाजप पाहत आहे. त्यात मागील निवडणुकीत भाजपने त्या दिशेने वाटचाल सुरू केली होती; मात्र शिवसेनेने राष्ट्रवादी आणि काँग्रेसला सोबत घेत भाजपचे मनसुबे धुळीस मिळविले होते. गेल्या निवडणुकीत शिवसेनेने महाविकास आघाडीची मोट बांधत सत्ता स्थापन केली. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या भाजपच्या हातातून थोडक्यात संधी हुकली; पण या वेळी थेट राज्यातून बळ मिळत असल्याने स्थानिक भाजप नेत्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या दौऱ्याने या चर्चांना उधाण आले आहे.



### राज्यातील वरिष्ठ नेत्यांकडून भाजपच्या स्थानिक नेत्यांना बळ

**शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतरदेखील जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शिवसैनिक पदाधिकारी आणि जिल्हा परिषदेतील सदस्यांनी उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहणे पसंत केले होते. तर असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी व जिल्हा परिषदेतील सदस्यांनी शिंदे यांना साथ दिली. असे असले तरी जिल्हा परिषदेच्या स्थापनेपासून काँग्रेस, राष्ट्रवादीची असलेल्या एकहाती सत्तेला सुरुंग लावण्याचे प्रयत्न भाजपसह शिवसनेनेदेखील केले; मात्र ते सत्यात उतरले नव्हते. त्यामुळे २०१७च्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भाजपने 'एकला चलो रे'चा नारा देत, कमळ फुलविण्याचे स्वप्न पाहिले होते. ते शिवसेनेच्या खेळीमुळे सत्यात उतरलेच नसल्याचे दिसून आले. त्यामुळे आता हे स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्यासाठी राज्यातील वरिष्ठ नेत्यांकडून भाजपच्या स्थानिक नेत्यांना बळ मिळत आहे. राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांच्या दौऱ्याने तशा चर्चा रंगू लागल्या आहेत.**

स्थानिक स्वराज्य संस्था काबीज करण्यासाठी सर्वच राजकीय पक्ष आपापली ताकद पणाला लावणार असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका महायुती म्हणून लढविल्या जाणार असल्याचा दावा करण्यात येत आहे; मात्र बदललेल्या राजकीय घडामोडींचा परिणाम या निवडणुकांवर होणार असल्याचा दावा जाणकार करीत आहेत. अशातच पहिल्यांदाच राज्याचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे हे ठाणे जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. या बैठकीवर भाजपची छाप दिसून आली. त्यामुळे गोरे यांच्या दौऱ्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

## उल्हासनगरत विजेचा भार वाढल्याने शेकडो घरातील विद्युत उपकरणांचे नुकसान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर, ता. २४

संततधार पावसात विजेचा लपंडाव आणि त्यात अचानक शनिवारी (ता. २१) विजेचा भार वाढल्याने उल्हासनगरात शंभरच्या वर घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे नुकसान झाले आहे. याबाबत वस्तूंची नुकसानाची भरपाई मिळण्यासाठी शिवसेना व युवासेनेने महावितरण कार्यालयात कार्यकारी अभियंता हरीश भराडे यांना निवेदन दिले आहे.

मागील काही दिवसांपासून कॅम्प नंबर एकमधील तानाजी नगर, गणगौर चौक परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत. असे असतानाच शनिवारी पुन्हा अचानक विद्युतपुरवठ्याचा भार वाढल्याने शंभरपेक्षा अधिक घरातील टीव्ही, फ्रीज, पाण्याच्या मोटारी, वाय-फाय राऊटर यासारख्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे मोठे नुकसान झाले आहे.

**नुकसान भरपाईसाठी शिवसेनेचे महावितरणला निवेदन**

या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. ही घटना घडल्यानंतर शिवसेना शाखाप्रमुख केशव ओवळेकर यांनी तत्काळ महावितरणच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून याची माहिती दिली, पण त्यास प्रतिसाद न मिळाल्याने सोमवारी (ता. २३) उपजिल्हाप्रमुख दिलीप गायकवाड, युवासेना शहर अध्यक्ष बाळा श्रीखंडे, शाखाप्रमुख केशव ओवळेकर यांनी नुकसान झालेल्या घरांची पाहणी केली. तसेच, वीजबिल एकत्र करून महावितरणचे कार्यकारी अभियंता हरीश भराडे यांना निवेदन देत लवकरात लवकर नुकसानभरपाई मिळावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.


## भिवंडीत अल्पवयीन मुलीचे अपहरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. २४ (वार्ताहर) :** निजामपुरा परिसरातील १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अज्ञाताने अपहरण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी अज्ञाताविरोधात निजामपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार जोया सरताज शेख (वय १३) रविवारी (ता. २२) रात्री साडेअकरा वाजता घरातून बाहेर गेली; मात्र ती घरी परतलीच नसल्याने तिचे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याच्या संशयावरून जोया हिचे वडील सरताज हमीद शेख यांनी तक्रार केली. त्यावरून अज्ञात व्यक्तीविरोधात निजामपुरा पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. महिला आणि मुलींच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारकडून विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी पथकासह इतर अनेक पथकांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत, तरी देखील अपहरणाच्या घटना समोर आल्या आहेत, यामुळं पालकांमध्ये भीती आणि चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.

## मुंब्रा- शीळ भागातील १७ इमारतींची न्यायालयीन चौकशी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे :** मुंब्रा येथील शीळ भागातील १७ बेकायदा इमारतींची उच्च न्यायालयाच्या सुचनेनुसार आता न्यायालयीन चौकशी होणार आहे. त्यासाठी ठाणे जिल्हा मुख्य सत्र न्यायाधीश एस.बी अग्रवाल यांनी अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश जी. जी. बन्साली यांची नियुक्ती केली असून ही समिती जमीन मालक, बांधकाम व्यावसायिक, पालिका अधिकारी अशी सर्वांची चौकशी करणार असल्याचे समजते.

या बेकायदा इमारती गेल्या वर्षी उभारण्यात आल्या. याप्रकरणी उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ठाणे महापालिकेने १२ बांधकामे जमीनदोस्त केली तर, उर्वरित बांधकामे तोडण्याची कारवाई सुरू आहे. सुनावणीदरम्यान, एक वरिष्ठ न्यायिक अधिकारी नियुक्त करून बेकायदा बांधकामांमध्ये जबाबदार असणाऱ्यांची चौकशी करावी, त्यात महापालिकेचे अधिकारी व आयुक्त यांच्यासह जबाबदारी निश्चित करावी, चौकशी सुरू झाल्यानंतर सहा आठवड्यांच्या आत अहवाल सादर करावा असे आदेश न्यायालयाने दिले होते.

या अहवालाच्या आधारे न्यायालय पुढील योग्य आदेश देणार आहे. महापालिकेचे अधिकारी दोषी आढळले, तर कायद्याप्रमाणे योग्य ती कारवाई केली जाईल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. उच्च न्यायालयाच्या सुचनेनंतर ठाणे जिल्हा मुख्य सत्र न्यायाधीश एस.बी अग्रवाल यांनी चौकशी अधिकारी नियुक्त केला आहे. याप्रकरणातील जमीन मालक, बांधकाम व्यावसायिक, पालिका अधिकारी अशी सर्वांचीच चौकशी करणार असून ही प्रक्रीया लवकरच सुरू होणार असल्याची माहिती न्यायालयीन सुत्रांनी दिली.

## मीरा भाईंदर महापालिका शाळांमध्ये कला शिक्षक नाही ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :-** मीरा भाईंदर महापालिका शाळांमध्ये अद्याप कला शिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली नाही. परिणामी, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कला गुणांना आवश्यक असा वाव मिळत नसल्याची खंत पालकवर्गाकडून व्यक्त केली जात आहे. महापालिकेच्या एकूण ३६ शाळांमध्ये सुमारे ९ हजार ५०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांमध्ये प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बळ कुटुंबांतील मुले शिक्षण घेतात. त्यामुळे या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी महापालिकेवर आहे. या उद्देशाने महापालिकेने गेल्या काही वर्षांत विविध योजना राबवल्या असून, त्यामुळे शाळांतील विद्यार्थी संख्येत वाढ झाली आहे. मात्र, दुसरीकडे या शाळांमध्ये कला शिक्षकच नसल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना चित्रकला, हस्तकला, नृत्य, संगीत यांसारख्या कलात्मक विषयांचे प्रशिक्षण मिळत नाही. शिक्षण विभागाने महापालिकांना शाळांमध्ये कला शिक्षकांची नियुक्ती करण्याचे आदेश दिले असून, त्यासाठी विशेष अनुदानाचीही तरतूद करण्यात आलेली आहे. तथापि, शिक्षकांची नियुक्तीच न झाल्यामुळे काही विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले उत्कृष्ट कला गुण दडपले जात असल्याचा आरोप आदिवासी विकास आढावा समितीचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी केला आहे. महापालिकेतील सुमारे २०० शिक्षकांपैकी अद्याप एकाही कला शिक्षकाची नियुक्ती करण्यात आलेली नाही. मात्र यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत नसल्याचा दावा महापालिकेच्या वतीने करण्यात आला आहे. अनेक शिक्षक स्वतःच कला गुणांनी संपन्न असल्याने तेच विद्यार्थ्यांना विविध कलांचा परिचय करून देतात, अशी माहिती उपायुक्त सचिन बांगर यांनी एका जाहीर बैठकीत दिली.

## सेतूच्या नव्या पाच लॉगिन आयडीमुळे वसईत तहसील कार्यालयात दाखल्यांना वेग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसईः** सुरवातीला वसईच्या तहसीलदार कार्यालयाच्या सेतू विभागात केवळ एकच महाऑनलाईन लॉगिन आयडी होता त्यामुळे दाखले वितरणात विलंब लागत होता. आता जिल्हा स्तरावरून नवीन पाच लॉगिन आयडी उपलब्ध करून दिल्याने आता विविध प्रकारच्या दाखले वितरणात सुलभता येईल असा विश्वास वसई तहसील विभागाने व्यक्त केला आहे.

वसई तहसीलदार कार्यालयातील सेतू विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने विविध शैक्षणिक दाखले दिले जातात. दररोज दिवसाला सरासरी १२०-१५० अर्ज येत असतात. मात्र सेतू विभागात एकच लॉगिन आयडी असल्यामुळे दाखल्यांचे काम संथ गतीने सुरू होते. वसई तालुक्याची लोकसंख्या साधारण २५ लाखांच्या घरात पोहोचली आहे, त्यामध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात आहेत. वसई तालुक्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारे उत्पन्न दाखले, अधिवास दाखले, जातीचे दाखले, नॉन क्रिमिलेअर दाखले, असे विविध दाखले सेतू विभागामार्फत ऑनलाईन पद्धतीने दिले जातात. मात्र वसई सेतू विभागात एकच लॉगिन आयडीवर काम होत असल्यामुळे दाखल्यांची अनेक प्रकरणे प्रलंबित राहत होती. विशेषतः विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन प्रवेशासाठी तसेच उच्च शिक्षणासाठी सेतू विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध दाखल्यांची आवश्यकता भासणार आहे. मात्र वसई सेतू विभागात एकच लॉगिन आयडीवर काम होत असल्यामुळे विद्यार्थी व पालकांची अडचण निर्माण होत होती.

## पीओपी वरील बंदी उठल्याने हजारो कारखान्यांना व कामगारांना दिलासा



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** पीओपी वरील बंदी उठून महाराष्ट्रातील हजारो कारखानदारांना व कामगारांना न्याय मिळवून दिला असून त्यांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लावल्याने दक्षिण भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी सांस्कृतिक मंत्री व रायगडचे संपर्कप्रमुख आशिष शेलार यांचे गणपती बाप्पांची सुबक मूर्ती व शाल देऊन आभार मानले. महाराष्ट्रासह भारत देशात तसेच जगभरात गणेश उत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. यासाठी लागणाऱ्या मूर्ती प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी ) ने बनवल्या जातात.पीओपी पर्यावरणाला हानिकारक असल्याचे हायकोर्टात याचिका दाखल झाल्याने गणपती कारखानदारांवर खूप मोठे संकट ओढावले होते. त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली होती. अशावेळी गणपती कारखानदारांच्या मदतीसाठी त्यांना साथ देण्यासाठी त्यांच्या पाठी कायम उभे राहून पीओपी वरील बंदी उठून गणपती कारखानदारांना सांस्कृतिक मंत्री तथा रायगड संपर्कप्रमुख आशिष शेलार यांनी मोठा दिलासा दिला आहे. गणपती कारखानदारांवर आलेले संकट गणपती बाप्पाच्या आशीर्वादाने सांस्कृतिक मंत्री तथा भाजप रायगड संपर्कप्रमुख आशिष शेलार यांनी दूर केल्याने भाजप रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी त्यांची भेट घेऊन पेणच्या गणपती कारखानदारांच्या वतीने आभार मानले. यावेळीॲड. मोहिते व मिलिंद पाटील आदी मान्यवर उपस्थित होते

## कल्याणच्या काळा तलावात उन्मळून पडला महाकाय वृक्ष

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
बातमीदार

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील काळा तलाव परिसरातील एक भला मोठा वृक्ष सोमवारी रात्री उन्मळून तलावात पडला. या वृक्षाच्या भारामुळे तलावाच्या काठावर असलेली संरक्षण जाळी देखील तुटली असून शाळकरी मुलांचा हा रहदारीचा रस्ता असल्याने यामुळे अपघात होण्याची भीती स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या घटनेनंतर अग्निशमन दलाने या वृक्ष या ठिकाणाहून बाजूला केला आहे.



# शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने अल्पदरात शैक्षणिक साहित्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण शहर व इतर परिसरातील सध्या सर्व शाळा शैक्षणिक वर्षाच्या तयारीला लागले असून सर्वच विद्यार्थांना प्रश्न पडतो कि, एवढ्या महागाईच्या काळात वह्या, शैक्षणिक साहित्य आणि पावसाळयासाठी लागणारी छत्री अथवा रेनकोट खरेदीसाठी लागणारे आर्थिक पाठबळ कसे आणायचे. यासाठी कल्याण शहर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) कल्याण विधानसभा संघटक प्रमुख रुपेश भोईर यांनी कल्याण पश्चिमेतील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कल्याण शहर परिसरातील व शाळांमधील सर्वच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व वह्या अगदी अल्प दरांत मुबलकपणे उपलब्ध करण्यांत आले आहे यावेळी सर्वच विद्यार्थ्यांना वह्या, पेन्सिल, पेन, कंपास असे शैक्षणिक साहित्य अल्पदरात वाटप करण्यांत येत आहे. तसेच नामांकित कंपनींच्या छत्र्या व रेनकोटचेही अल्पदरात वाटप होत आहे. नागरिकांना अल्पदरात हे साहित्यउपलब्ध होत असल्याने नागरिकांनी रुपेश भोईर यांचे आभार मानत आहेत.



# पक्ष बांधणीसाठी ठाण्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या हालचाली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे, ता. २४ राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विधिमंडळ गटनेते डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत शहरातील एमएआयएम काँग्रेस आणि विविध सामाजिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या कार्यकर्त्यांनी पक्ष प्रवेश केला आहे. त्यामुळे पक्षाला लागलेली गळती थांबवण्यापेक्षा नवीन नेते आणि कार्यकर्ते घडवण्याच्या दृष्टीने राष्ट्रवादी शरद पवार गट ठाण्यात सक्रिय झाला आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांचा गड असलेल्या कळवा येथील माजी नगरसेवकांनी रामराम ठोकत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. आव्हाडांसाठीचा हा सर्वात मोठा धक्का मानला जात होता. अशातच आगामी पालिका निवडणुकीची तयारी सुरू करताना ठाण्यात राष्ट्रवादी शरद पवार गट मजबूत करण्याच्या दृष्टीने रणनीती आखली जात असून, पक्षाने कार्यकर्त्यांची नवीन फळी उभारण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार सोमवारी पक्ष कार्यालयात कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश पार पडला. या वेळी नेतृत्वाच्या धर्मनिरपेक्ष विचारधारेवर विश्वास ठेवून हा पक्षप्रवेश केल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. या वेळी खासदार बाळा म्हात्रे, शहराध्यक्ष सुहास देसाई, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, महिलाध्यक्ष सुजाता घाग, कळवा-मुंब्रा विधानसभाध्यक्ष शमीम खान उपस्थित होते.

**हा संघर्षाचा काळ**

**सध्या पक्षाच्या संघर्षाचा काळ आहे. या काळातही शमीम खान आणि मुफ्ती अशरफ यांच्या पुढाकारातून शेकडो कार्यकर्ते पक्षात आले आहेत. पक्षात आलेले हे कार्यकर्ते धर्मनिरपेक्ष विचारधारेवर चालणारे आहेत. सध्याच्या अस्थिर वातावरणातही राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षच न्याय करू शकतो, यावर लोकांचा विश्वास असल्याचे डॉ. जितेंद्र आव्हाड या वेळी म्हणाले.**

# शुभम पिंगळेच्या उत्तुंग यशाने गोरठणचे नाव महाराष्ट्राच्या शिखरावर

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



पेण :: धनाजी घरत

शुभम हा लहानपणा पासूनच हुशार तल्लख बुद्धीचा व अभ्यासूवृत्तीचा मुलगा आहे. त्याचे प्राथमिक शिक्षण कारमेल स्कूल पेण येथे झाले आहे. इयत्ता आठवी मध्ये त्याने स्कॉलरशिप मिळवली. S.S.C. परीक्षेत 92 % गुण मिळवले. या गुणांच्या मेरिटवरच VJTI सारख्या नामवंत शासकीय कॉलेजमध्ये डिप्लोमा साठी प्रवेश मिळवला. हे शिक्षण घेत असताना 92% ते 99% पर्यंतचा पल्ला कोणत्याही प्रकारचा क्लास न लावता स्वतः मेहनत जिद्द चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर शुभम ने आपली बुद्धिमत्ता सिद्ध केली आणि हे उत्तुंग यश प्राप्त केले.सुजितकुमार पिंगळे' यांचे सुपुत्र शुभम पिंगळे याने मुंबई येथील व्हिजेटीआय ( VJTI )या शासकीय कॉलेजमध्ये डिप्लोमा इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग परीक्षेत 98.89% गुण मिळवून खालापूर तालुक्यात गोरठण सारख्या ग्रामीण भागाचे नाव महाराष्ट्राच्या शिखरावर पोहोचवल्याबद्दल संपूर्ण छत्तिशी विभाग वावोशीकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे . शुभमचे वडील सुजितकुमार पिंगळे हे देखील एक इलेक्ट्रिकल इंजिनिअर असून त्यांनी 1988 साली छत्रपती विद्यालय वावोशी येथे S.S.C. परीक्षेत प्रथम क्रमांक, खोपोली येथील बी. एल. पाटील पॉलिटेक्निक या कॉलेजमध्ये ग्रामीण भागातून जाऊन डिप्लोमा मध्ये प्रथम क्रमांक मिळवला आहे.त्यानंतर त्यांनी उद्योग क्षेत्रात जाऊन पिंगळे जनरल स्टोअर्स, सरिता प्रिंटर्स, सायली इलेक्ट्रिकल्स व शुभम इंडस्ट्रीज हे उद्योग सुरू केले. उद्योग क्षेत्रात यश प्राप्त करून उत्तुंग भरारी घेतली असून त्यांनी वावोशी सारख्या ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे.शुभम आणि त्याच्या दोन बहिणी यांना घडवण्यात त्यांची आई सौ. सायली सुजितकुमार पिंगळे यांचा सिंहाचा वाटा आहे.योग्य मार्गदर्शन उत्तम संस्कार कष्ट व मेहनत घेऊन या उभयतांनी स्वप्राली आणि समृद्धी या दोन मुलींना इंजिनीयर करून M.B.A. सारखं उच्च शिक्षण दिले. त्या आज नामवंत कंपनीत मोठ्या पदावर कार्यरत आहेत .अशा प्रकारे आपल्या तिन्ही मुलांना उत्तम व उच्च शिक्षण चांगले संस्कार देऊन पिंगळे कुटुंबाने छत्तिशी विभागात एक आदर्श घालून दिला आहे. याची सुरुवात पिंगळे गुरुजी व पिंगळे बाई यांनी शिक्षण क्षेत्रात केलेले योगदान होय. शिक्षणाची ही परंपरा माहिती व तंत्रज्ञानाच्या स्पर्धेच्या युगात त्यांच्या नातवांनी चालवली आहे. पिंगळे कुटुंब हे एक आदर्श व सुसंस्कृत कुटुंब म्हणून नावलौकिकास आले आहे. शुभमचे हे उत्तुंग यश आणि गुणगौरवा बरोबर पुढील प्रगती व वाटचालीसाठी सर्वांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# तीन दिवसांपासून पूल पाण्याखाली

## वाड्यातील मानीचा पाडा , कातकरी वाडीतील ग्रामस्थांची प्रचंड गैरसोय



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा, ता. २४ (बातमीदार)

वाडा तालुक्यातील गोन्हे ग्राम पंचायतीच्या हद्दीतील मानीचा पाडा गावातील पूल तीन दिवसांपासून पाण्याखाली गेला आहे. परिणामी, येथील नागरिकांचा संपर्क तुटला असून, या पाड्यातील व कातकरी वाडी अशा दोन गावांतील ग्रामस्थांची प्रचंड गैरसोय झाली आहे. मानीचा पाडा हे गाव ३० घरांचे, तर कातकरी वाडी १५ ते २० घरांची अशी दोन्हीही गावे १०० टक्के आदिवासी लोकवस्ती असलेली आहेत. या गावातील नागरिकांना ये-जा करण्यासाठी असलेले छोटे पूल तीन दिवसांपासून पाण्याखाली गेल्याने गावातील नागरिकांचा संपर्क तुटला आहे. येथील सर्व विद्यार्थी गोन्हे येथील शाळेत जातात. या विद्यार्थ्यांची तीन दिवसांपासून शाळा बंद झाल्याने शैक्षणिक नुकसान झाले आहे. गर्भवती माता, अबालवृद्ध, शेतकऱ्यांचेही प्रचंड हाल झाले आहेत.

> मानीचा पाडा गावातील हा रस्ता जिल्हा परिषदेकडे आहे. त्यांनाही यासंदर्भातील माहिती देण्यात येणार आहे. तसेच, आमच्याकडून प्रस्ताव करून या गावासाठी एक मोठा पूल बांधण्यासाठी निश्चितच प्रयत्न करण्यात येईल.
>
> **- संजय डोंगरे, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, वाडा**

■■■

> मानीचा पाडा गावासाठी पूल व्हावा, यासाठी सरकार दरबारी पत्रव्यवहार करून पाठपुरावा करत आहे. परंतु, पूर्तता न झाल्याने तो लालफितीत अडकल्याने येथील नागरिकांची गैरसोय होत आहे.
>
> **- अनिल खिल्लारे, उपसरपंच ग्रामपंचायत गोन्हे**

# संरक्षक भिंत कोसळून अनेक गाड्यांचे नुकसान

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**कल्याण :** निर्माणधीन असलेल्या इमारतीच्या बांधकाम साहित्याच्या दबावामुळे इमारतीची संरक्षक भिंत कोसळून अनेक टू व्हीलर आणि काही चारचाकी गाड्यांचे नुकसान झाले आहे. कल्याण पूर्वेच्या काटे मानिवली परिसरात हा प्रकार घडला आहे. तर यासंदर्भात संबंधित बांधकाम व्यावसायिकाला सोसायटीकडून वारंवार पत्रव्यवहारही करण्यात आल्याची माहिती मिळत आहे. कल्याण पूर्वेच्या काटेमानिवली परिसरात योगेश्वर टॉवर नावाची सोसायटी आहे. या सोसायटीला लागूनच गेल्या काही महिन्यांपासून नव्या इमारतीचे बांधकाम केले जात आहे. त्यामुळे याठिकाणी सतत रेती, खडी आदी बांधकाम साहित्य मोठ्या प्रमाणात उतरवले जात आहे. मात्र त्याच्याकडून अद्याप याठिकाणी कोणतीही भिंत बांधण्यात आली नसल्याने हे बांधकाम साहित्य शेजारील योगेश्वर टॉवरच्या संरक्षक भिंतीला लागून टाकले जात असल्याची माहिती सोसायटीकडून देण्यात आली. तसेच या बांधकाम साहित्यामुळे संरक्षक भिंतीवर मोठा दबाव देऊन भिंतीला धोका निर्माण होऊन एखादी दुर्घटना घडू शकते. अशी भिती सोसायटीने व्यक्त करत त्यासंदर्भात संबंधित बांधकाम व्यावसायिकाकडे पत्रव्यवहारही केला होता. मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे आजच्या या घटनेवरून सिद्ध होत असल्याचे सोसायटीकडून सांगण्यात आले. दरम्यान सोमवारी रात्री योगेश्वर सोसायटीची ही भलीमोठी भिंत कोसळली यामुळे अनेक टू व्हीलर आणि काही चारचाकी वाहनांचेही नुकसान झाले असल्याने रहिवाशांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच या बांधकाम व्यावसायिकाविरोधात पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून झालेल्या नुकसानाची भरपाई लवकर न दिल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा रहिवाशांनी दिला आहे.

# पालघर जिल्ह्यातील बोगस वैद्यकीय व्यवसायाला आळा घाला

## - जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड यांचे निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघर, ता. २४ (बातमीदार):** बोगस वैद्यकीय व्यवसायाला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड यांनी दिलेत. जिल्हास्तरीय बोगस वैद्यकीय व्यवसायिक शोध समितीची सभा डॉ. इंदूराणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समितीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. समित्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व वैद्यकीय व्यावसायिकांच्या अर्हतांची तपासणी पूर्ण करावी. तपासणी पूर्ण झाल्यानंतर नवीन स्थापन होणारे दवाखाने कोणते, ते चालविणारे व्यावसायिक अधिकृत आहेत का, यांचा शोध घेणे समितीला सोपे होईल. असे जाखड म्हणाल्या. तपासणीत अनधिकृत वैद्यकीय व्यावसायिक आढळल्यास त्यांच्यावर गुन्हा दाखल करावेत. तसेच समाज माध्यम व इतर ठिकाणावरून प्राप्त होणाऱ्या तक्रारींची तत्काळ दखल घेऊन तपासणी करावी. बोगस डॉक्टर आढळून आल्यास तत्काळ गुन्हा दाखल करावा, असे आदेशही जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

# राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर देण्याची मागणी

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर देण्याची मागणी राष्ट्र कल्याण पार्टीने केली असून याबाबत राष्ट्र कल्याण पार्टीचे महासचिव राहुल काटकर यांनी केडीएमसी आयुक्तांना आणि वैद्यकीय आयुक्तांना पत्र दिले आहे. राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेमध्ये २०१५ सालापासून २७० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत. शासन नियमानुसार, या अभियानांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना दरमहा एक तारखेला नियमित वेतन अदा करणे अपेक्षित आहे. परंतु, गेल्या अनेक महिन्यांपासून या कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर अदा केले जात नाही. वेळोवेळी विचारणा केल्यानंतर "फंड आलेला नाही" अथवा "सही प्रक्रियेत आहे" आदी कारणे सांगण्यात येतात. परिणामी, कर्मचाऱ्यांच्या मानसिक व आर्थिक स्थैर्यावर गंभीर परिणाम होत आहेत. हे अत्यंत दुर्दैवी असून राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे आयुक्त व संचालक यांच्या आदेशांचेही उल्लंघन होत आहे. त्यामुळे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी आणि संबंधित विभागास कर्मचाऱ्यांचा पगार वेळेवर देण्याचे आदेश दयावेत. तसेच भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती उद्भवू नये याकरिता योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी राहुल काटकर यांनी केली आहे.

# रिक्षा चालकांवर दंडात्मक कारवाई

## रिक्षा टॅक्सी संघर्ष कृती समितीतर्फे आंदोलनाचा इशारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण शहर वाहतूक शाखा व पोलीस विभागाच्या माध्यमाने रिक्षा चालकांवर चौथ्या सीट साठी 66 ( A ) 192 नुसार 10 हजार रुपये दंडात्मक कारवाई करून कलम 207 नुसार रिक्षा जप्त करण्यात येत आहे त्यामुळे चालक यांना मानसिक त्रास व आर्थिक नुकसान होत आहे. महाराष्ट्र पोलीस ॲप हा सरकारी ॲप असून त्यामध्ये तपासणी केली असता, रिक्षा चालक यांच्यावर 66 ( A ) 192 ओवर सीट साठी लागू होत नसून त्यासाठी कलम MVA 125 / 177 व 194 A लागू होत आहे आहे. त्यामुळे रिक्षा चालकांवर केली जाणारी अन्यायकारक दंडात्मक कारवाई थांबण्याची मागणी करत हि कारवाई न थांबविल्यास रिक्षा टॅक्सी संघर्ष कृती समितीतर्फे तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

वाहन चालक यांनी वाहनांची नोंदणी न करता वाहन चालवणे किंवा परवान्याशिवाय चालवणे असा गुन्हा केला तर त्या वाहन चालक यांच्यावर 66 A 192 कलमानुसार कारवाई होऊ शकते. पण कृती समितीला संलग्न असलेल्या संघटनेचा असा समज होत चाललेला आहे की शासनाला महसूल कमी पडतोय म्हणून अशा पद्धतीने अन्यायकारक कारवाई करून रिक्षा चालकाला 66 A 192 कलमा अंतर्गत कारवाई करून कोर्टात पाठवून दहा हजार रुपयांचा दंड आकारण्यात येतो.

त्यामुळे कृती समिती ने संबंधित विभागास विनंती केली आहे की विभागांच्या कर्मचारी वर्गास मोटर वाहन अधिनियम व नियम नुसार वाहन चालकांनी केलेल्या गुन्हा नुसारच योग्य ती आणि सत्य वस्तुस्थिती नुसार कारवाई करण्यात यावी असा समज देण्यात यावा. मुलांची शाळा कॉलेजेस सुरू झालेले आहेत अशावेळी रिक्षा चालकांची गाडी जमा केल्यामुळे त्यांच्या आर्थिक बाजूवर परिणाम होऊन मानसिक त्रास होत आहे. सुरु असलेली अन्यायकारक कारवाई त्वरित थांबवण्यात यावी अन्यथा लोकशाही मार्गाने कृती समितीचे अध्यक्ष महेंद्र मिश्रा, संघर्ष ऑटो सेना रिक्षा युनियन ठाणे जिल्हा अध्यक्ष, कृती समितीचे उपाध्यक्ष मोहन पाठारे, रिपब्लिकन रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटना कल्याण शहराध्यक्ष विल्सन काळपुंड, कृती समितीचे कार्याध्यक्ष तथा भाजपा वाहतूक संघटना अध्यक्ष यांच्या नेतृत्वात भिक मागो आंदोलन करून ज्या वाहन चालकांवर अन्याय करत कारवाई झालेली आहे अशा रिक्षा चालकांचा दंड भरून शिल्लक रक्कम वाहतूक विभागाच्या माध्यमाने शासनाला देण्यात येईल असा इशारा रिक्षा टॅक्सी संघर्ष कृती समितीतर्फे देण्यात आला आहे.

# १२ वर्षीय मुलगा शॉक लागून गंभीर जखमी

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** कल्याण पश्चिमेतील रौनक सिटीमध्ये १२ वर्षीय मुलाला शॉक लागल्याने तो गंभीर जखमी झाला आहे. इमारतीच्या उद्यानात खेळताना लोखंडी रॉडला शॉक लागल्याने जखमी झाला. हि घटना सीसीटीव्हीत कैद असून विहान देवळे असे या मुलाचे नाव आहे. कल्याण पश्चिममधील रौनक सिटी या गृह संकुलात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. उद्यानात खेळत असताना १२ वर्षीय विहान देवळे या मुलाला लोखंडी रॉडमधून शॉक लागून तो गंभीर जखमी झाला. ही घटना सीसीटीव्हीत कैद झाली असून, या घटनेनंतर सोसायटीतील नागरिकांमध्ये संतापाचं वातावरण पसरलं आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY MATHS | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

# आर्यारवी एंटरटेनमेंट आयोजीत कलाकार बॉक्स क्रिकेट लीग उत्साहात संपन्न



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई, परेल :** आर्यारवी एंटरटेनमेंटच्या तिसऱ्या आंतरराष्ट्रीय लघुपट महोत्सवाच्या यशस्वी पर्वानंतर आर्यारवी एंटरटेनमेंटने प्रथमच कलाकार बॉक्स क्रिकेट लीगचे आयोजन केले होते. ह्या बॉक्स लीगचे उदघाटन प्रसिद्ध समाजसेवक सन्माननीय डॉ. कौतिक दांडगे सर (संस्थापक, अध्यक्ष - महाराष्ट्र बाजार पेठ) यांच्या हस्ते नुकतेच परेल येथील टर्फ मैदानावर नारळ वाढवून करण्यात आले. याप्रसंगी आर्यारवी एंटरटेनमेंट प्रॉडक्शनचे सर्वेसर्वा श्री महेश्वर भिकाजी तेटांबे, प्रसिद्ध समाजसेवक सुशांत साळुंखे, आयोजक राजवीर जाधव, प्रबोधन शिरवाडकर, प्रणेश लोगडे, लक्ष्मी मनीष गुप्ता, अविनाश राऊत, संचित यादव, सागर डोके, संदीप भाकरे, अविनाश राऊत, समीर काळबे, सिने ग्राफिक डिझायनर मनीष व्हटकर, प्रसिद्ध लेखक दिग्दर्शक अनंत सुतार, रमेश यादव सर आदी मान्यवर उपस्थित होते.

ही बॉक्स क्रिकेट लीग फक्त एकांकिका, नाटक, दूरदर्शन, मालिका आणि सिनेमा यातील कलावंतापुरता मर्यादित होती. या बॉक्स क्रिकेट लीगमध्ये एकूण आठ संघ सहभागी झाले होते. त्यात प्रामुख्याने "साठेची कार्टी", "सिने डान्सर", "मोरया", "कर्टन कॉल", "ॐ साई प्रॉडक्शन", "भावकादेवी प्रॉडक्शन", "स्वामी समर्थ कलामंच" आणि "के स्टार". परेल वर्कशॉप जवळील मध्य रेल्वे मेकॅनिक्स इन्स्टिटयूट पोल मुंबई १२ क्रिकमेनिया ग्रीनलंड या टर्फ मैदानावर रंगलेल्या उत्साही वातावरणातील जोशपूर्ण अशा अटीतटीच्या आणि मनोरंजकपूर्ण सामन्यात मुंबईच्या "सिने डान्सर" संघाने बाजी मारून कलाकार बॉक्स क्रिकेट लीग - २०२५ चा कै. भिकाजी महादेव तेटांबे आणि कै. मनोरमा भिकाजी तेटांबे यांच्या स्मरणार्थ प्रथम विजेता चषक पटकावला तर "मोरया" संघाने कौतिक दांडगे यांच्या सौजन्य प्रित्यर्थ उपविजेता चषक पटकावला. त्याचप्रमाणे या बॉक्स क्रिकेट लीगमध्ये लोकनेते कै. विठ्ठलदादा खाडे आणि कै. सुनीताताई विठ्ठलराव खाडे यांच्या स्मरणार्थ 16 मॅन ऑफ द मॅच, कै. गीता आनंदा जाधव यांच्या समरणार्थ मॅन ऑफ द सिरीज, कै. शामराव नारायण व्हटकर आणि कै. हौसाबाई शामराव व्हटकर यांच्या स्मरणार्थ उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज आणि क्षेत्ररक्षक अशी विविध पारितोषिके प्रदान करण्यात आली. आर्यारवी एंटरटेनमेंटची ही प्रथमच कलाकार बॉक्स क्रिकेट लीग - २०२५ टूर्नामेंट यशस्वीरीत्या संपन्न करण्यासाठी सौ माधुरी मांजरेकर (म.उप.विभाग संघटक-वडाळा विधानसभा-उबाठा), डॉ. साजिदा अत्तर (प्रसिद्ध समाजसेविका), श्री.मनीष पाथरे (जिल्हा संपर्क अध्यक्ष द. रत्नागिरी - मनविसे), खलील शिरगांवकर (प्रसिद्ध समाजसेवक), दिलीप कराड, भूषण शिर्के (प्रसिद्ध समाजसेवक), शैलेश काळे (प्रसिद्ध समाजसेवक), श्रीं नितीन जाधव (प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक), श्री कुशल धुरी (उपाध्यक्ष - मनविसे), आणि सो लक्ष्मी मनीष गुप्ता (प्रसिद्ध समाजसेविका) यांनी विशेष मेहनत घेतली. अशा तऱ्हेने खेळीमेळीच्या आणि कलावंतांच्या जोशपूर्ण वातावरणामध्ये आर्यारवी एंटरटेनमेंटची ही पहिली कलाकार बॉक्स क्रिकेट लीग उत्साहात संपन्न झाली

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com